विविध संकलनात्मक

# संस्कार – पाठ


१०७६

म. ग्रं. सं. ठाणें.

विषय काव्य

सं. क्र. 2389





REFBK-0022523

REFBK-0022523


...ादक व संग्राहक

... अच्युत महाराज

शिवभवन – श्री क्षेत्र कौंडण्यपूर (विदर्भ)

मूल्य )

( नित्योपासना


धर्मग्रंथ प्रकाशन, शिवभवन – श्री क्षेत्र कौंडण्यपूर

॥ ॐ ॥

॥ श्री गुरुदेव ॥

## विविध संकलनात्मक

# संस्कार-पाठ

मराठी ग्रंथ संग्रहालय
2309
225 23
शाखा

अनुवादक व संग्राहक

**श्री संत अच्युत महाराज**

शिवभवन- श्री क्षेत्र कौंडण्यपूर ( विदर्भ )

REFBK-0022523
REFBK-0022523

मूल्य ) (नित्योपासना

धर्मग्रंथ प्रकाशन, शिवभवन - श्री क्षेत्र कौंडण्यपूर
जि. अमरावती (विदर्भ)

धर्मग्रंथ प्रकाशन पुष्प ३१ वे

प्रकाशक : वि. गो. जोशी (तिवसकर)
धर्मग्रंथ प्रकाशन,
शिवभवन- श्री क्षेत्र कौंडण्यपूर
ता. चांदूर ( रेल्वे ), जि. अमरावती (विदर्भ)

सर्वाधिकार : लेखकाधीन

अनुवादक व संग्राहक : श्री संत अच्युत महाराज
शिवभवन- श्री क्षेत्र कौंडण्यपूर

मुद्रक : व. म. गुप्ते, सुभाष मुद्रणालय,
व्यवस्थापक : वि. गो. जोशी (तिवसकर), तपोवन-अमरावती

द्वितीय संस्करण :
प्रति- १५००

मुद्रण तिथी :

श्री ब्रम्हचारी महाराज महायात्रा
श्री क्षेत्र रेवसा, पौष वद्य दशमी
शके १८९७ जानेवारी १९७६

मूल्य : नित्योपासना

॥ श्री गुरुदेव ॥



ब्रम्हविलीन राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज

# शुभ समर्पण

परमेश्वराच्या सुसंस्कारित मानवी मूर्तीचे सत्दर्शनासाठी अखंड तेवत असणाऱ्या संत क्षेत्रातील प्रज्वलित ज्ञानदीपांच्या कार्यपात्रात संस्कारपाठाची ही अल्प तेलवात वाढविली जात आहे. पुनर्मुद्रित होणाऱ्या या अल्प साहित्यसेवेला श्री गुरुदेवाचा प्रसन्न आशिर्वाद असो.

अच्युत

# प्रकाशकाचे दोन शब्द

श्री क्षेत्र कौंडण्यपूरच्या धर्मग्रंथ प्रकाशनाचे धर्मग्रंथप्रसार-कार्य होईल तितके सुरू असते. या प्रकाशनातील श्री संत अच्युत महाराज विरचित नित्योपयोगी धार्मिक पुस्तकांच्या अभ्यासाची आवड जनमानसात उत्तरोत्तर वाढत आहे हे सुदैव होय.

प्रस्तुत महर्गतेच्या काळात पुस्तकांची निर्मिती ही सुलभ गोष्ट नाही. मुद्रणांत आर्थिक व सामाजिक अनेक अडचणी निर्माण होतात. अशा अवस्थेत नित्योपयोगी पडणारी पुस्तके उपलब्ध होण्यासाठी ज्या भाविकांचे आम्हाला सहाय्य लाभत आहे ते अभिनंदनाला पात्र होत. धर्मग्रंथांचा प्रसार धार्मिक लोकांनी करावयाचा असतो.

श्री संत अच्युत महाराज अनुवादित व संग्रहित "संकार-पाठ" प्रथमत: नागठाणा साधना शिबिर प्रसंगी गतवर्षी वरुड-निवासी श्री. शेरेकर यांनी मुद्रित करून जनतेस नित्यवाचनाला अर्पण केले. त्या सुसंस्कार प्रसारक पुस्तकाचे महत्व जाणून या वर्षी श्री क्षेत्र रेवसा येथे सद्‌गुरु ब्रम्हचारी महायात्रेत तो "संस्कार-पाठ" पुन्हा मुद्रित होवून प्रकाशित होत आहे.

ते पुस्तक विनामूल्य नित्य वाचनासाठी भाविकांना अर्पण केल्या जाईल. त्या मुद्रणाचा खर्च खोलापूरनिवासी श्री. रामलाल शाह, श्री. चुन्निलाल शाह, श्री. रमणलाल शाह, गं. भा. जानकी-बाई शाह, श्री. अरुणकुमार शाह, श्री. सुभाष मोतीलालजी काळे व श्री. गोपाळराव सूतकर यांनी देण्याचे अंगिकारले असून या उदाराश्रय देणारांचे आम्ही सदैव आभारी आहोत.

साहित्यलेखकाप्रमाणे साहित्यप्रसारकांचे स्थान समाजात अत्या-वश्यक असते. वेळोवेळी आमच्या प्रकाशनातील मुद्रित पुस्त-कांना आपुलकीने अशी सहायता ज्यांनी दिली व पुढेही जे या कार्यास सहयोग देतील त्या सर्वांचे आम्ही अभिनंदन करतो.

आमची धार्मिक पुस्तके धर्मभावनेने व आत्मियतेने मुद्रित करून अमरावती येथील जगदंबा कुष्ठधाम तपोवनच्या सुभाष प्रेसने धर्मप्रसारकार्यास फार मोठा हातभार लावला आहे. तेथील सहयोगदात्यांचे आम्ही आरोग्यपूर्ण शुभचिंतन करतो.

विविध सुसंस्काराच्या मार्गात ही संस्कारपाठाची अल्प दीपज्योती भाविकांच्या सतत उपयोगी पडावी आणि अशा पारमार्थिक कार्याचा लाभ मिळत रहावा ही ईश्वराला नम्र प्रार्थना आहे.

| | |
|---|---|
| धर्मग्रंथ प्रकाशन, शिवभवन | प्रकाशक, |
| श्री क्षेत्र कौंडण्यपूर (विदर्भ) | **वि. गो. जोशी (तिवसकर)** |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

श्री संत अच्युत महाराज



शिवभवन - श्री क्षेत्र कौंडण्यपूर (विदर्भ)

## ★ प्रातःस्मरण ★

( छंदवृत्त : अनुष्टुप् )

सौख्यकर्ता सर्वदाता, कोटि सूर्यापरी प्रभा !
निर्विघ्न कार्य हो सारे, विघ्नहर्ता गजानना ॥१॥

गणनाथ सरस्वती, रवि शुक्र बृहस्पती ।
पंचक स्मरता ऐसे, वेदवाणी प्रकाशते ॥२॥

गुरु ब्रह्मा गुरु विष्णु, गुरु देव महेश्वर ।
गुरु साक्षात् परब्रह्म, वंदे श्री गुरुपीठ ते ॥३॥

वसुदेवसुत देव, कंस चाणुरमर्दन ।
देवकीपरमानंद, कृष्ण वंदे जगद्गुरु ॥४॥

मंगल भगवान विष्णु, मंगल गरुडध्वज ।
मंगल पुंडरीकाक्ष, मंगलायतन हरि ॥५॥

पुण्यश्लोक नलराजा, पुण्यश्लोक युधिष्ठिर ।
गायत्री सावित्री वन्दे, पुण्यश्लोक जनार्दन ॥६॥

कराग्री राहते लक्ष्मी, तळहाती सरस्वती ।
बोटा अंतरी गोविंद, प्रभाती हात पाहणे ॥७॥

समुद्र-पैठणी शोभे, पर्वत स्तनमंडल ।
विष्णुपत्नी पृथ्विदेवी, पदस्पर्शा क्षमा कर ॥८॥

दिनचर्या रात्रिचर्या, आराधन तुझे प्रभो ! ।
आंत बाहेर हा सर्व, एक नारायण हरी ॥९॥

ॐ नमो नारायणाय !

# - प्रातर्ध्यान -

।। जय गुरुदेव ।।

## ★ भूमिवंदन ★

( वृत्त : भुजंगप्रयात )

नमो मातृभूमि जिथे जन्मलो मी ।
नमो आर्यभूमी जिथे वाढलो मी ।
नमो धर्मभूमि तुझीयाच कामी ।
पडो देह माझा सदा ती नमी मी ।।१।।

## ★ सूर्यवंदन ★

ॐ मित्र रवि सूर्य भानु खग पूष,
हिरण्यगर्भ मरिचादित्य सवित्रार्क भास्करेभ्योनमः ।।

## ★ स्नानाचे वेळी स्मरण ★

( वृत्त – अनुष्टुप् )

सर्व गंगा सप्त सिंधू जलपात्रांतरी वसे ।
स्नानमात्रे दोष जातो, सर्व भावे विशुद्धता ।।१।।

गंगा गंगा असे बोले, दूर गंगेचिया जरी ।
सर्व पापे दूर होती, उपकार स्मरा तिचे ।।२।।

पाणी कोठचेही राहो, जीवन सकळास दे ।
ब्रह्मदर्शन पाणी हे, स्नान भक्तिच थोर ही ।।३।।

## ★ सूर्य नमस्कार ★

ॐ मित्राय नमः ॐ रवये नमः ॐ सूर्याय नमः ॐ भानवे नमः ॐ खगाय नमः ॐ पूषाये नमः ॐ हिरण्यगर्भाय नमः ॐ मरीचये नमः ॐ आदित्याय नमः ॐ सवित्रे नमः ॐ अर्काय नमः ॐ भास्कराय नमः

## ★ देवपूजा ★

( छंद-अनुष्टुप् )

विश्वाकारे जगन्नाथा ! प्रत्यक्ष तूच देव हा ।
परब्रम्हा प्रतिमा ही, तुझ्याविण दुजो नसे ॥१॥
पात्र पाणी मंत्र तंत्र, आसन तूच ईश्वरा !
पूजणारा तरी तूची, अनन्य भक्ति पूजन ॥२॥
कुंकुमे कामनापूर्ती, हरिद्रा मंगलास दे ।
अक्षता शुभकारी या, फुलांनी होयि आदर ॥३॥
वस्त्रालंकार नैवेद्य, धूप दीपारती बरी ।
साहित्यप्रार्थना हो ती, पूर्ण जीवन पावण्या ॥४॥
सज्जन संत देवाला, मायबापास पूजिले ।
ते पावे परमात्म्याशी, देवपूजा महान ही ॥५॥

## ★ धर्मसमर्पण ★

( वृत्त : शार्दूलविक्रीडित )

धर्माच्या करिता आम्हास जगती रामानि धाडीयले ।
ऐसे जाणुनि रामभक्तिकरिता ऐश्वर्य हे लाभले ।
आता धर्मसख्या तुझ्या पुढति हा नम्रत्वतेने असे ।
इच्छा हो जरि मानसी करितसे हा देह पूजा असे ॥

## ★ राष्ट्ररक्षा-गीत ★

रक्ष रक्ष ईश्वरा भारता प्राचीना जनपदा ।
भोगियली बहु जये एकदा वैभव सुखसंपदा ।।धृ.।।
सगरद्वीपाहुनी सिंधु तो काश्मिरा पासुनी ।
कृष्ण कुमारीकडे शांतिचे राज्य देई पसरूनी ।
स्नेहभाव धर्उनिया पुत्र हे ऐक्य करित झडकरी ।
कर्तव्या जागुनी करू दे कर्तव्ये ही खरी ।
शाश्वत सत्य ज्ञान दिवाकर, उगवो हृदयांतरी ।
धर्मतेज देखुनी चकित हो देववृंद अंबरी ।
गाढतमी बुडतसे राष्ट्र हे, उत्बोधन या करी ।
कृपाकटाक्षे पुन्हा चढू दे वैभव शिखरावरी ।
रोमरंध्री चैतन्य खेळवी राष्ट्राच्या ईश्वरा ।
सातसमुद्रावरी फडकू दे यशोध्वजा सुंदरा ।

चाल- हे पार्थसारथे ! हे कंसारी विजयवंता !
हे एक वचनी रामा ! हे धनुर्धरानंता !
सोडी न यास विकला हा काल असे पडता ।
आर्यपुत्र जरी अपात्र दिसले, घ्यायाशी या पदा ।
रक्ष भारता सहाय्यहीना ईशाचिरसौख्यदा ।

## ★ गुरुबोध-प्रभाती ★

( चाल-कसा निभवशी काळ )

उठा गडचा अरुणोदय झाला, श्री सत्‌गुरुच्या ज्ञानाचा ।
सोडा काम विकार बिछाना, नाश करा अज्ञानाचा ।।धृ.।।

बघा अंबरी पक्षी बरळती विवेक-बोधाची दाटी ।
वैराग्याची लाली निघाली, आर्ताच्या जिवनकाशी ॥१॥
भक्ति फुवारे झुळझुळ उडती प्रेमाच्या वायू-किरणी ।
साक्षिराज तो अलख जागवी हाक देई दारावरुनी ॥२॥
क्षमा शांति अजी, दया-गोधने वृत्तीवत्स घेऊनी निघती ।
अनुभव- शिखरी जाति चराया अगमनिगम-चारा बघती ॥३॥
श्रद्धेचा दरवाजा उघडा, या श्रुती-स्मृतिचे वैरानी ।
तुकड्यादास म्हणे जागृत व्हा, नका करू ही वेळ उणी ॥४॥

## ★ मनाबोध - जागृती ★

(चाल- मोरे मना जाग जरा)

माझ्या मना जाग जाग दिवस निघाला ।
कर्तव्या लाग लाग, काळ धावला ॥ धृ. ॥
काही ना करशो जरी, वाया मग जाशी तरी ।
मरणाच्या वाटेवर, तूंहि लागला --- माझ्या मना ॥१॥
सत्‌गुणी हो शीलवान, शिस्तीचा नितिमान ।
उपकारी निरभिमान, होई थोरला माझ्या मना ॥ २ ॥
राष्ट्राशी उन्नत कर, धर्माने शांती धर ।
अच्युत म्हणे भज ईश्वर एक भूमिला--- माझ्या मना ॥३॥

## ★ शक्तिस्मरण - भजन ★

( चाल- अंबा कोणी दाखवा )

दुर्गा देवी आठवा, ही अंबादेवी आठवा
ज्ञानांजन् लेवोनीया, अंतरात साठवा ॥ धृ. ॥

जिने मानवी काया दिधली । माय होउनी करुणा केली ।
मूळ तियेशी पाठवा - - - - दुर्गा देवी ॥ १ ॥
माय होवोनी दूध पाजले । बाप होवुनी अन्न चारले ।
उपकाराला आठवा - - . दुर्गा देवी ॥ २ ॥
सत्गुरु होवुनी देई ज्ञाना, अच्युताशी दे मंगल जिवना ।
जगजननी ती भेटवा - - - दुर्गा देवी ॥ ३ ॥

## ★ संकल्पगीत ★

( तर्ज– अब तेरे बीना कौन मेरा )

आओ सभी मिल जायके, प्रभु ध्यान धरेंगे ।
सबका भला करो, यही आवाज करेंगे ॥टेक॥
बैठेंगे एक लैन लगा करके सामने ।
अपने बनाये भावको, रख करके सामने ।
हम सिरको झुकायेंगे, अभिमान हरेंगे ॥ १ ॥
गायेंगे वही गाना, सेवक पुकारते ।
लायेंगे अमलमे सदाहि, दिल सुधारते ।
निर्भय बनेंगे, ना कभी कालोंसे डरेंगे ॥ २ ॥
आती रहे हवा भली, दुनियामे जोरकी ।
छोडेंगे नही कामना, प्यारे किशोर की ।
तुकड्या कहे गुरुदेवसे, भवधार तरेंगे ॥ ३ ॥

## ★ प्रातःस्मरण ★

प्रातः स्मरामि हृदि संस्फुरदात्मतत्वम् ।
सच्चित्सुखं परमहंसगतिं तुरियम् ॥
यत् स्वप्न – जागर – सुषुप्तमवैति नित्यम् ।
तद् ब्रम्ह निष्कलमहं न च भूतसंघः ॥ १ ॥

प्रातर्भजामि मनसो वचसामगम्यम् ।
वाचो विभान्ति निखिला यदनुग्रहेण ॥
यत्रेतिनेति वचनैर्निगमा अवोचु – ।
स्तं देवदेवमजमच्युत माहुरग्रयम् ॥२॥
प्रातर्नमामि तमसः परमर्कवर्णम् ।
पूर्णं सनातनपदं पुरुषोत्तमाख्यम् ॥
यस्मिन्निदं जगदशेषमशेष मूर्ती ।
रज्ज्वा भुजंगम अिव प्रातिभासितं वै ॥३॥

## ★ ध्यानाचा पाठ ★

हे गुरुदेव । हम सबको सद्बुद्धि दे । सत्कर्तव्य करनेकी प्रवृत्ति दे । सच बोलनेका अभ्यास दे । सत् स्वरुपका ग्यान दे । हे जगद्व्यापी परमेश्वर । हम हर मनुष्यमात्रसे प्रेमका, सत्यताका, बंधुत्व भावका आचरण करें और सुखदुःखमे सम रहे, ऐसी हमको शक्ति दे । युक्ति दे और भक्ति दे ।

हे सर्व धर्ममे, सर्व संतमे, समस्त संसारमें रममाण होनेवाले चैतन्यघन । हम तेरे लिये, तेरे देशके लिये, हर जीवजंतुके लिये, कुटिलताका, अनैतिकताका, छलछिद्र द्रोहताका त्याग करें, ऐसा साहस दे । हे भगवन ! अंतमे तुझमे समरस हो जाये यह हमारा ध्येय है, उद्देश है । अिसके लिये तुझको स्मरके निश्चय करते है । प्रतिज्ञा करते है । हे विश्वधर्मको नियम करनेवाले परमात्मा ! जहाँ भी जिधर भी, हममे कुछ कमी दिखती हो, उसमें हमारा ध्यान लगाकर उस चीजको, उस कार्यको पूरा करनमे हम अपना स्वराज्य

समझते है, सुराज्य समझते है। यह समझनेकी और कर्तव्य करनेकी हमको प्रियता दे, शक्ति दे, वरदान दे।

## ★ रामधून ★

जय बोलो सत् धर्मोंकी। जय बोलो सत् कर्मोंकी।
जय बोलो मानवताकी। जय बोलो सत् जनताकी।
हम सब कष्ट उठायेंगें। सब मिलकर सुख पायेंगे।
सब मिल सद्गुण गायेंगे। सबका जश फैलायेंगे।।
पिछडी कोई न जाति हो। सब की सबपर प्रिती हो।
देश धर्म मे निती हो। हम सबके ही साथी हो।।
सब मिल नव निर्माण करे। बहु संग्रहका दान करे।
विश्व स्नेहका ध्यान करे। सबका सब सन्मान करे।।
मुफ्त कभी नही खायेंगे। सत् सेवा कर जियेंगे।
ईश्वर भक्ति बढायेंगे। गुरुका नाम चलायेंगे।।

(यानंतर सरळ सहजावर राहून डोळे मिटून इष्टदेवतेचे क्षणभर ध्यान करावे.)

## ★ आत्मचिन्तन ★

अपने आतमके चिंतनमें, हरदम जागृत रहना है।
ओहँ सोहँ श्वाससे अपनी, अंतरदृष्टि निरखना है।। टेक।।
चंचल मनकी बुद्धि विचारक, शुद्धि सतत ही करना है।
निश्चल कर वृत्तिकी धारा, अंतरमुखसे स्थिरना है।।
सहज समाधी चलते हलते, सब कामोंमे रखना है।
विश्वरूप विश्वात्मक दृष्टी, अनासक्तिसे चखना है।।

सुख–दुख दोनो जीवधर्म हैं, इनसे निवृत्त होना है।
सदा आत्म–आनंदकी मस्ती, पलपलमें अनुभवना है।
संत मिले सतसंग लाभ कर, ग्यान–ध्यानमें रमना है।
कर्म फलोंका त्याग निहित कर, शांति स्थानमें जमना है।
इस मानव जीवनमें इतनी, मंजिल चढकर जाना है।
"तुकड्यादास" कहे यह बानी, रोज-रोज ही गाना है।

## ★ भजनधुन ★

नारायण-नारायण जय गोविन्द हरे ॥
नारायण-नारायण जय गोपाल हरे ॥
गोविन्द हरे गोपाल हरे । गोपाल हरे गोविन्द हरे ॥

## ★ शांतिपाठ ★

हरि ॐ पुर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पुर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवाव शिष्यते
ॐ शान्तिः। शान्तिः। शान्तिः ! ! !
सद्‌गुरुनाथ महाराजकी जय !

## ★ शिवोपासना ★

### श्री शिव मंगल–ध्यान

( वृत्त–शिखरिणी )

सदाशीवाचे मी हृदयी धरतो ध्यान बरवे।
तयाचेनी जागे हृदय भवनी ज्ञान बरवे ॥
जया मृत्यु आहे सकल जग हे तोच रचतो।
जगाच्या रूपानें नटुनी पुढती तोच उरतो ॥१॥

महद्‌भूतांचे जो वदन मिरवी पंचमुख हा ।
जगत्कल्याणाची शिरि धरतसे अक्षत पहा ॥
स्विकारी बिल्वाशी त्रयगुण बरे पत्र म्हणुनी ।
महामाया पत्नी गणपतिस दे जन्म सगुणी ॥२॥
महाकाळाला ही शिवस्मरण लागेच करणे ।
मुनीमार्कंडेये शिवपदि दिले अंति धरणे ॥
महाविषाचेही पचन सहजे जो शिव करी ।
शिवाला मी ध्यातो सतत धरुनी नाम अधरी ॥३॥
( यापुढे ॥ ॐनमः शिवाय ॥ ११ वेळ जपावे. )

## ★ आरती श्री शंकराची ★

( चाल– ॐ जय जय जय दुर्गे )

ॐ हर हर हर महादेव ।
जय शिव ओंकारा, हर शिव ओंकारा ॥
चंद्रकोर शोभे शिरी गंगाजलधारा ॥ ॐ हर हर. ॥धृ.॥

शांति–हिमाचली आसन कैलासावरती ।
त्रिशूल डमरू हाती ज्ञानाग्नी प्रखरा ॥ ॐ हर हर. ॥१॥

गणेश कार्तिक बाळे जनमंगलकारी ।
तुझी सुंदरी गिरिजा पराभवी असुरा ॥ ॐ हर हर. ॥२॥

योगानंद अखंडित वैभव त्यागाचे ।
पाप ताप भक्तांचे दैन्य दुरीत हरा ॥ ॐ हर हर ॥३॥

त्रिपूरहंता अमृतमंथनी हालाहल प्याला ।
त्रेतायुगी अवतरला अंजनीकुमरा ॥ ॐ हर हर. ॥४॥

नंदीकेश्वर काळ तुझ्या चरणी ।
अच्युत आरती उजळुनी नमितो दातारा ॥ॐ हर हर. ॥५॥

## ★ आरती श्री गुरुची ★

( चाल–आरती करो शंकरकी )

आरती उजळतो आज, धन्य महाराज,
गुरो ! तुज लाज । नमन तव पाया ।
भाविका तार गुरुराया ॥धृ.॥
भवसागर भरला भारी । अम्ही सापडलो जलधारी ।
छळती हे काम आणि क्रोध, पचेना बोध,
नसे तव शोध । अपार ही माया ।
बुडविते उघड जीवना या ॥१॥
गर्वांध कितीतरी मेले । विषयांध कितीतरी गेले ।
नाचते मरण हे शिरी, बैसले उरी,
धाक अंतरी । तळमळे काया ।
तुजविणा कोण दे अभया ॥२॥
घडो हातुनी सेवा काही । जन्माचे सार्थक होई ।
अशी कृपा व्हावी मजवरी, चरण मी धरी,
गुरुरूप हरी । भेट दिना या ।
अच्युता ज्ञान दे सखया ॥३॥

## ★ भजन धुन ★

श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे । हे नाथ नारायण वासुदेव ।
प्रद्युम्न दामोदर विश्वमूर्ते । मुकुंद विष्णूर्भगवन नमस्ते ।

## ★ प्रार्थना श्लोक ☆

( वृत्त : मालिनी )

नमन गुरुपदाला भाळ ठेवूनी पायी ।
विमल मन असू दे मागणे अन्य नाही ।
जगत रुप तुझे हे काही सेवा घडू दे ।
'हरि हरि' मुखि गाता देह कार्यी पडू दे ॥१॥

## ★ द्वादश ज्योतिर्लिंगे ★

( छंद: अनुष्टुप् )

सोमनाथ सौराष्ट्रात । काशीचा विश्वनाथ तो ।
उज्जेनीत महाकाल । घुश्मेश्वर शिवालयी ॥१॥
भीमाशंकर डाकनी । सेतुबंध रामेश्वर ।
त्र्यंबक गौतमीतीरी । नागेश दारुकावनी ॥२॥
मल्लिकार्जुन श्रीशैली । केदार हिमपर्वती ।
वैद्यनाथ पाटणाचा । ओंकार नर्मदातटी ॥३॥
द्वादश ज्योतिर्लिंगे ही । आठविता सदोदित ।
हरती सर्व ही पापे । अपार सिद्धि लाभते ॥४॥

## ★ शिववंदन ★

( वृत्त-भुजंगप्रयात )

सदाशीव सर्वत्र आत्मा जगाचा ।
विधी विष्णू तो जीव या देवतांचा ।
जगी मोक्ष तो साक्षि सर्वा जनाशी ।
तया सेविती तेच ते धाम काशी ॥१॥

शिवाचे जिथे रम्य मंदिर आहे ।
शिवोपासना भक्तिने चालताहे ।
तिथे तो उमाकांत स्वानंद सेवी ।
जिथे नित्य राहे दया धर्म जीवी ॥२॥
घडो राष्ट्रसेवा घडो धर्मसेवा ।
घडो लोकसेवा घडो आत्मसेवा ॥
घडीने घडी ही घडो सार्थकाते ।
नमो शंकरा ! हे ! नमस्ते नमस्ते ॥३॥

## ★ अतिथ शुभकामना ★

( छंदवृत्त : अनुष्टुप् )

स्वातंत्र्य सौख्य आरोग्य, लाभो सर्वत्र या जना ।
पूर्णकाम असो सारे, दुःख थोडे नसो कुणा ॥१॥
योग्य काळात वर्षा ह्यो, पिकावे धान्य पृथ्विचे ।
क्षोभ देशातुनी जावो, कोणालाहि नसो भय ॥२॥
तेज वीर्य बल ओज, सत्चारित्र सहिष्णुता ।
थोर गुण तुझे देवा, आम्हा सर्वास येऊ दे ॥३॥
असत्यातुनी सत्याचे, अंधारातुनी ज्योतिचे ।
मरणांत अमृताचे, घडू दे प्रभू दर्शन ॥४॥
वृद्धश्रवा विश्ववेदा, अरिष्टनेमि बृहस्पति ।
होवो मंगल सर्वांचे, देवांना हीच प्रार्थना ॥५॥
देवा ! राज्य नको देवूं, सौख्य भोग नको मला ।
पीडितांचे अनाथांचे, दुःख दूर करीन मी ॥६॥
कानांनी शुभ ऐकू दे, डोळ्यांनी शुभ पाहू दे ।
हे जीवन तुझे देणे, महिमा तुझी गावूं दे ॥७॥

## ★ जयघोष ★

श्रीं गुरुदेव की जय !

श्री गुरुदेव की जय ! !

श्री गुरुदेव की जय ! ! !

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज की जय !

सब संतनकी जय ! जनता जनार्दनकी जय !

सद्‌गुरुनाथ महाराज की जय !


भारतमाता की जय ! !

गोपाल कृष्ण भगवान की जय !

पार्वतीपते हर हर महादेव !

धर्म भगवान की जय !

हरिः ॐ तत्सत्



# ✻ दीप वंदन ✻

( छंद : अनुष्टुप )

शुभ करावे कल्याण, आरोग्य धर्मसंपदा ।
शत्रुबुद्धि नाश पावो, दीप ज्योति नमो नमो ॥

**★ सायं–प्रार्थना ★**

यं ब्रम्हा वरुणेंद्र रूद्र मरुतं स्तुवंति दिव्यैस्तवै ।
वेदै सांगपदः क्रमोपनिषदै गायंतियं सामगाः ।
ध्यानावस्थित तत्गतेन मनसा पश्यंतियं योगिनो ।
यस्यांतं न बिंदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः ॥

शांताकारम् भुजगशयनं पद्मनाभम् सुरेशम् ।
विश्वाधारम् गगनसदृशं मेघवर्णं शुभांगम् ।
लक्ष्मीकांतम् कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यम् ।
वन्दे विष्णुं भवभयहरं सर्व लोकैकनाथम् ॥

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृत्ता ।
या वीणावरदन्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना ।
या ब्रम्हाच्युतशंकरःप्रभुतिभिर्देवैः सदा वन्दिता ।
सा मां पातु सरस्वती भगवती निशेःष जाड्या पहा ॥१॥

मूकं करोती वाचालं पंगुमं लंघयते गिरीम् ।
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्द माधवं ॥२॥

आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।
सर्वदेव नमस्कारः केशवं प्रति गच्छति ॥३॥

नमोऽस्तु ते व्यासं विशालबुद्धे । फुल्लार विन्दायत पत्रनेत्र ।
येन त्वया भारत तैल पुर्णः । प्रज्वलितो ज्ञानमयः प्रदिपः ॥४॥

वसुदेवसुतं देवं कंस चाणूरमर्दनम्
देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ॥५॥

## ★ आरती शंकराची ★

( चाल– कितीतरी गोड तुझे नाम )

जै जै शिवशंकर भगवान । भोलेनाथ दयाल हमारे ॥टेक॥
मंथन से हालाहल आया। त्रिभुवनको जो आग लगाया।
पीगये गिरिजापती महान। भक्तजनोंके प्राणपियारे ॥१॥
त्रिशुल डमरू हाथमें सोहे। योगेश्वर सबका मन मोहे।
दाता कौन तुम्हारे समान। दीन पतितनके तारण हारे ॥२॥
भसम त्याग का तन को रमाये। शांति क्षमा भुषण पहिराये।
हरते दानवका अभिमान। काल बली संहारन हारे ॥३॥
कैलास में गंगातट पावन। समाधिमें बैठे मनभावन।
कहता अच्युत दो वरदान। उजारे पाँचो प्राण हमारे ॥४॥

## ★ आरती श्रीरामाची ★

( चाल–भागवता ओवाळू आरती )

श्रीरामा तुज आरती गातो। रामरूप सर्वांतरी ध्यातो ॥धृ.॥

धन्य अयोध्या नगरी पावन। जन्मा आला दशरथ नंदन।
राम भक्तिचा आम्र बहरतो। श्रीरामा तुज. ॥१॥

कौसल्येशी बाळ जाहला। भरत शत्रुघ्न बांधव ज्याला।
सौमित्राची सेवा घेतो। श्रीरामा तुज. ॥२॥

जनकनंदिनी सीता कांता। वनवासी रामा अनुसरता।
रावण दैत्य कुळासह मरतो। श्रीरामा तुज. ॥३॥

वीर मारुती कपिकुल तारी। राम नाम लोका उद्धारी।
अच्युत भावे वंदन करितो। श्रीरामा तुज. ॥४॥

## ★ आरती श्री राधेश्यामकी ★

आरती उतारुँ मै तो राधेश्यामकी रे राधेश्यामकी ।
प्राणोकी ज्योत लावूं आठो यामकी रे आठो यामकी ॥टेक॥
श्याम मेरी माया, श्याम मेरी काया ।
शामकी मै हूँ छाया ब्रिजधामकी । आरती. ॥१॥
शामका संसार ये, सारमें नि:सार ये ।
श्यामका दरबार ये धरती तीनो ज्यामकी । आरती. ॥२॥
श्यामकी श्यामा छयी, दीवानी दुनिया भई ।
श्यामने लीला कियी जो शंकर–जो सीयारामकी । आरती. ॥३॥
भारतके आधार तुम । नर जीवनका सार तुम ।
अच्युतका वंदन तुम्हे । चाह लगी वस प्रेमकी । आरती. ॥४॥

## ★ आरती श्री सद्‌गुरुची ★

( चाल – ॐ जय जगदीश हरे )

ॐ श्री माणिक गुरुदेव ।
राष्ट्रसंत तुकडोजी सद्‌गुरु परब्रम्ह स्वयमेव ॥धृ०॥
माय मंजुळा पिता बंडुजी, यावली ग्रामाशी ।
ब्रम्हभट्ट हा वली जन्मला, ग्रामजयंतीशी ॥१॥
पूर्वपुण्य उगवले तयाचे, वरखेडी आला ।
मायबाईचा प्रसाद आडकु, वरदायक झाला ॥२॥
योगी सिताराम बंधु, दामोधर स्वामी ।
लहानुजीसारखे तपोधन, यांचा हा प्रेमी ॥३॥
वनवासी हा योग्याभ्यासी, सागर ज्ञानाचा ।
लोकोद्धारासाठी झिजला, तिळतिळ जीव याचा ॥४॥

अमरज्योत गुरुकुंजी पाहे, वाट भाविकांची ।
अच्युत वंदुनी भावे करतो, आरती श्रीगुरुची ।५।।

### ★ प्रार्थना–श्लोक ★

( छंद–हरिगिती )

माधव! तुम्ही महादेव हो, ब्रह्मा तुम्ही विष्णू तुम्ही ।
देवी तुम्ही हो देवता साधु महात्मा हो तुम्ही ।
जो सो तुम्हारा रुप है, ऐसी नजर पावन बने ।
अच्युत कहे भक्ति दिजे भवसिंधू ये तिरजावने ।।१।।

### ★ भजन–धुन ★

रघुपति राघव राजाराम, पतितपावन सीताराम ।
सुंदर माधव मेघश्याम, जानकीजीवन रामनाम ।।
ईश्वर अल्ला तेरे नाम, सबको सन्मति दे भगवान ।
भारतके रखवारे राम, दीनजनोंके प्यारे श्याम ।।
सियाबररामचंद्रकी जय !
पवनसुत हनुमानकी जय !
सबसंतनकी जय ! सद्‌गुरुनाथ महाराजकी जय !

### ★ गोविंद प्रार्थना ★

वाजवी रे, वाजवी रे
वाजवी अपुली मधूर मुरली, वाजवी रे ।।धृ.।।
ये ममनयना, हरि मधुसुदना । वेळ किती येण्यासी उरली ।।१।।
दाखवी चरणा बा भवतरणा । त्रिविध तापे वृत्ती जळली ।।२।।
दे मज प्रेमा शमवी कामा । ने निजधामा मज वनमाली ।।३।।
तुझी अच्युता आस अनाथा । ये धावत बघ आयु सरली ।।४।।

## ★ शुभेच्छा ★

(वृत्त : पृथ्वी)

सुसंगती सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो ।
कुतर्क मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो ।
संदध्रिकमळी दडो, मुरडिता हटाने अडो ।
वियोग घडता रडो, मन भवच्चरित्री जडो ॥१॥
न निश्चय कधी ढळो, कुजना–विघ्न बाधा टळो ।
न चित्त भजनी चळो, मति सदुक्ती मार्गी वळो ।
स्वतत्व हृदया कळो, दुरभिमान सारा गळो ।
पुन्हा न मन हे मळो, दुरित आत्मबोधे जळो ॥२॥

## ★ सत्‌नाम ★

गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला !
गोपाल कृष्ण भगवान की जय !

## ★ भक्तेच्छा ★

(अभंग)

सदा माझे डोळा जडो तुझी मूर्ती । रखुमाईच्या पती सोयरीया ॥१॥
गोड तुझे रूप गोड तुझे नाम । देई मज प्रेम सर्वकाळ ॥२॥
विठो माउलीये हाचि वर देई । संचरोनी राही हृदयी माझ्या ॥३॥
तुका म्हणे कांही न मागो आणिक । तुझे पायी सुख सर्व आहे ॥४॥

## ★ सुश्लोक याचना ★

( वृत्त-भुजंगप्रयात )

सदा सर्वदा योग तुझा घडावा ।
तुझे कारणी देह माझा पडावा ।
उपेक्षू नको गुणवता अनंता ।
रघुनायका मागणे हेचि आता ।।१।।

नमो विठ्ठला राजया पांडुरंगा ।
नमो रुक्मिणी माउली ज्ञानगंगा ।
नमो चंद्रभागा नमो पुंडलीका ।
नमस्कार माझा संता अनेका ।।२।।

कैलासराणा शिवचंद्रमौळी ।
फणिंद्रमाथा भ्रुकुटी झळाळी ।
कारुण्य सिंधु भवदुःखहारी ।
तुजविण शंभो मज़ कोण तारी ।।३।।

ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे ।
त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे ।
मी लावितो मस्तक ज्या ठिकाणी ।
तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही ।।४।।

उपासनेला दृढ चालवावे ।
भूदेव संताशी सदा नमावे ।
सत्कर्म योगे वय घालवावे ।
सर्वा मुखी मंगल बोलवावे ।।५।।

## ★ शांतिपाठ ★

ॐ पूर्णमदः पूर्ण मिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्ण मेवावशिष्यते ॥
ॐ शान्तिः ! शान्तिः ! ! शान्तिः ! ! !

(सामुदायिक प्रार्थना)

## ★ मंगलस्मरण ★

(छंद : सवैय्या)

मंगल नाम तुम्हार प्रभू, जो गावे मंगल होत सदा ।
अमंगलहारी कृपा तुम्हारी, जो चाहत दिलको धोत सदा ।
तुम आद अनाद सुमंगल हो, अरुरूप तुम्हार निरामय है ।
तुकड्या कहे जो भजता तुमको, नित पावत मंगल निर्भय हे ।

## ★ प्रार्थनाष्टक ★

है प्रार्थना गुरुदेवसे, यह स्वर्गसम संसार हो ।
अति उच्चत्तम जीवन बने, परमार्थमय व्यवहार हो ।
ना हम रहे अपने लिए, हमको सभीसे गर्ज है ।
गुरुदेव ! यह आशीश दे, जो सोचनेका फर्ज है ॥
हम हो पुजारी तत्वके, गुरुदेव के आदेश के ।
सच प्रेम के, नित नेम के, सद्धर्म के सत्कर्म के ॥
हो चीढ झुठी राहकी, अन्यायकी अभिमानकी ।
सेवा करन को दासकी, पर्वा नहीं हो जान कीं ॥
छोटे न हो हम बुद्धी से, हो विश्वमयसे ईशमय ।
हो राममय अरु कृष्णमय, जगदेवमय जगदीशमय ॥

हर इंद्रियोंपर ताब कर, हम वीर हो अति धीर हो ।
उज्ज्वल रहे सरसे सदा, निजधर्मरत खंबीर हो ।।
यह डर सभी जाता रहे, मनबुद्धिका इस देह का ।
निर्भय रहे हम कर्ममें, परदा खुला कर स्नेहका ।।
गाते रहे प्रभू, नाम पर, प्रभू, तत्व पानेके लिये ।
हो ब्रम्हविद्याका उदय, यह जी तरानेके लिये ।।
अति शुद्ध हो आचारसे, तन मन हमारा सर्वदा ।
अध्यात्मकी शक्ती हमें, पलभी नही कर दे जुदा ।।
अिस अमर आत्माका हमें, हर श्वासभरमें गम रहे ।
गर मौत भी हो आगयी, सुख-दुःख हममें सम रहे ।
गुरुदेव! तेरी अमर-ज्योती का हमें निज ज्ञान हो ।
सत्ज्ञान ही तू है सदा, यह विश्वभरमें ध्यान हो ।।
तुझमे नही है पंथ भी, ना जात भी ना देश भी ।
तु है निरामय एकरस, है व्याप्त भी अरु-शेष भी ।।
गुण-धर्म दुनियामें बढे हर जीवसे कर्तव्य हो ।
गंभीर हो सबके हृदय, सच ज्ञान का वक्तव्य हो ।।
यह दुर हो सब भावना, 'हम नीच है अस्पृश्य है ।
हर जीवका ही शुद्ध मन, जब कर्म उनके स्पृश्य है' ।।
हम भिन्न हों इस देहसे, पर तत्व से सब एक हो ।
हो ज्ञान सबमें एकही, जिससे मनुज निःशंक हो ।।
तुकड्या कहे अैसा अमरपद, प्राप्त हो संसार में ।
छोडे नही घरबार पर, हो मस्त गुरु-चरणार में।।

### ★ श्री दत्त भजन ★

दत्ता दिगंबरा ये रे, दयाळा मला भेट दे रे ।।ध्रु.।।

त्रासलो गड्या त्रिविध तापे,बहुत मी आचरलो पापे ।
आपुल्या गांवा तरी ने रे, दत्ता दिगंबरा ये रे ।।

## ★ प्रार्थना – गीत ★

ए विश्वके चालक प्रभो ! मुझमें समझ दे विश्वकी ।
इस अखिल मानवधर्म के, आदर्श उँचे वेष की ।।टेक।।
दु:ख है इसका हमें, हम अवनती क्यौं पा रहे ।
शील यह हममें भरा, सेवा करें हम देशकी ।।१।।
है मनुज हम देह से, पर कर्म हैं सब भूलके ।
सोचने की बुद्धी दे, आदर्शवत् संदेश की ।।२।।
पक्ष और उपपक्ष में, खाते है गोते जोरसे ।
प्रभू ! ऐक्यता का ग्यान दे, बंधन कटाकर द्वेष की ।।३।।
धर्म किसका हो कोई, पर वर्म सबके एक हो ।
हम भाई सम बिचरें सदा, लहरे चले सन्तोषकी ।।४।।
हो गरीब या के अमिर, सुख – दु:ख सबमें एक हो ।
अगर मर मिटे तो हम सभी, हो ख्याल ऐसे होशकी ।।५।।
धीर हो गंभीर हो, हम वीर हो संसार में ।
बस दान यह दीजे प्रभो ! सेवा – करे जगदीशकी ।।६।।
आजकी यह वक्त है, सौभाग्य चंदन लेपकी ।
कहत तुकड्या भीख दे, जो कुछ रहे अवशेषकी ।।७।।

## ★ गजर ★

जय जय रामकृष्ण हरि, जय जय रामकृष्ण हरि ।।
राजाराम कृष्ण हरि, जय जय रामकृष्ण हरि ।।

## ★ पसायदान ★

आता विश्वात्मके देवे, येणे वाग्यज्ञे तोषावे ।
तोषोनिया मज द्यावे, पसायदान हे ॥
जे खळांची व्यंकटी सांडो, तया सत्कर्मी रती वाढो ।
भूता परस्परे जडो, मैत्र जीवांचे ॥
दुरितांचे तिमीर जावो, विश्व स्वधर्म सुर्ये पाहो ॥
जो जे वांछिल, तो ते लाहो, प्राणिजात ।
वर्षंते सकल मंगळी, ईश्वर निष्ठांची मांदीआळी ।
अनवरत भूमंडळी, भेटो तया भुता ॥
चला कल्पतरुंचे अर्व, चेतना चिंतामणीचे गाव ।
बोलती जे अर्णव, पियुषांचे ।
चंद्रमे जे अलांछन, मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वहि सदा सज्जन, सोयरे होति ।
किंबहुना सर्व सुखी, पूर्ण होवुनी तिन्ही लोकी ।
भजी जो आदि पुरुषी, अखंडीत ।

( पसायदानानंतर शांतिपाठाचे आधी प्रार्थनेस उपस्थित असणाऱ्या थोर पुरुषांचे थोडक्यात प्रार्थनेच्या विषयावर मार्गदर्शन ऐकावे. )

## ★ शांतिपाठ ★

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामया ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चिद् दुःखमाप्नुयात् ।
ॐ शान्ति ! शान्ति ! ! शान्ति ! ! !

श्री गुरुदेवकी जय ! ! !

सद्गुरुनाथमहाराज की जय !

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजकी जय !

सब संतनकी जय !

भारतमाता की जय !

## ★ विष्णुनाम–प्रार्थना ★

(छंद–ओवी)

श्री अनंता मधुसूदना, पद्मनाभा नारायणा ।
जगद्व्यापका जनार्दना, आनंदघना अविनाशा ॥१॥
सकळ देवाधिदेवा, कृपाळूवाजी तू केशवा ।
महानंदा महानुभवा, सदाशिवा सहजरूपा ॥२॥
चक्रधरा विश्वंभरा, गरुडध्वजा करुणाकरा ।
सहस्रपादा, सहस्रकरा, क्षीरसागरा, शेषनयना ॥३॥
कमलनयना कमलापति, कामिनी मोहना मदनमुर्ति ।
भवतारका धरिताक्षिती, वामनमुर्ती त्रिविक्रमा ॥४॥
अगा हे सगुणा निर्गुणा, जगत्जनित्या जगत्जिवना ।
वसुदेव–देवकीनंदना, बाळरांगणा बाळकृष्णा ॥५॥
तुका आला लोटांगणी, मज ठाव द्यावा तवचरणी ।
हीच करितसे विनवणी, भवबंधनी सोडवावे ॥६॥

गोपाल कृष्ण भगवान की जय !

पार्वतीपते हर–हर महादेव !

धर्म भगवानकी जय !

## ★ षोडश – पूजा ★

(छंद : ओवी)

प्रथम करावे ध्यान । मग बोलावणे ते आवाहन ।
आदरे द्यावे आसन । पाद्य ते पाय धुणे ॥१॥
अर्घ्य ते धुवावे हात । आचमन चूळ भरीत ।
स्नान वस्त्रोपवस्त्र । द्यावी चंदन विलेपने ॥२॥
पुष्पे धूप दीप नैवेद्य । प्रणाम प्रदक्षिणा जय निनाद ।
मन ठेवुनी विशुद्ध । षोडश पूजा साधावी ॥३॥

## ★ श्री विष्णुस्मरण ★

ॐ केशवाय नमः । नारायण नमः । माधवाय नमः । गोविंदाय नमः । विष्णवे नमः । मधुसूदनाय नमः। त्रिविक्रमाय नमः। वामनाय नमः। श्रीधराय नमः । हृषिकेशाय नमः । पद्नाभाय नमः । दामोदराय नमः । संकर्षणाय नमः । वासुदेवाय नमः । प्रद्युम्नाय नमः । अनिरुद्धाय नमः । पुरुषोत्तमाय नमः । अधोक्षजाय नमः। नारसिंहाय नमः । अच्युताय नमः । जनार्दनाय नमः । उपेंद्राय नमः । हरये नमः । ॐ श्रीकृष्णाय नमः ।

## ★ गायत्री मंत्र ★

ॐ भूर्भुवः स्वः ॐ तत्सवितुर्वरेण्यं भर्गोदेवस्य धीमहि धियोयोनः प्रचोदयात् !

## ★ संकल्प व देववंदन ★

(छंद : ओवी)

श्री मन्महागणपती । सरस्वती । श्रीगुरु वेदमूर्ति । इष्टदेव
कुलदेवतेप्रती । नमन माझे ॥१॥ कुलदेवता स्थानदेवता ।

ग्रामदेवता वास्तुदेवता । पुरंदर महेश नारायण देवता । बाल काम नमो नमो ॥२॥ परशुराम माता पिता । आदित्य नवग्रह देवता । सर्व देवता ब्रह्मिभूता । वदिता व्हावे निर्विघ्न ॥३॥ मला सर्वोत्तम लाभ व्हावा । जय अभय आरोग्य ऐश्वर्या । सर्व कल्याण व्हावया । माझा संकल्प ॥४॥ समस्त विश्वाचे कल्याण । हेची इच्छितो फलदान । असंख्य रुपी नारायण । होवो प्रसन्न विश्वात्मा ॥५॥

## ★ ग्रंथवाचन प्रारंभ ★

मंगल नमन – ( छंद – हरिगिती )

वंदन तुम्हे गणराज हे माता सरस्वती कर दया ।
सब देव दैवतको नमन साधुजनो कर दो दया ।
परब्रह्म परमात्मा तेरी दुनियां ये मगलमूर्ति है ।
ऐसी रहे स्फूर्ति सदा गावूं तुम्हारी किर्ति है ॥

( छंद – दोहा )

भक्ति प्रथम बाचू सुनु, तेरे मधुर पुराण ।
अच्युतको भक्ति दिजो, दया सिंधु भगवान ॥

## ★ श्री गुरुवंदन ★

( वृत्त – भुजंगप्रयात )

नमो सद्‌गुरु ज्ञानदीपप्रकाशा । नमो आदिरूपा अनंता परेशा ।
नमो मंगलमंगलम् द्वैत हारी। नमो त्वत्कृपा पूर्ण दोषा निवारी॥१॥
तुझे रूप ते पाहू दे विश्वव्यापी । तुझी पाउले सेवु दे ग्रामरूपी ।
तुझे ज्ञान सर्वांतरी संचरु दे । तुझा सत्य आनंद लोकी भरू दे ॥२॥

खरे काम निष्काम ती ग्रामसेवा। झटूं सर्वभावे करूं स्वर्ग गावा।
कळो हे वळो देह कार्यी पडूं दे। घडूं दे प्रभू एवढे हे घडूं दे ॥३॥

श्री सद्गुरुनाथ महाराजकी जय !

(यानंतर ज्या देवतेचा ग्रंथ असेल तो जयघोष करून ग्रंथ-पाठाला ईश्वर स्मरणपूर्वक सुरुवात करावी.)

## ★ भोजन विधी ★

(भुकेच्या वेळी हात-पाय स्वच्छ धुवावे, चूळ भरावी व मग आसनावर स्वस्थ चित्ताने सहजासन घालून बसावे. श्रीमत् भगवत् गीतेचा बारावा किंवा पंधरावा अध्याय म्हणावा.)

श्री भगवत् गीता, अध्याय बारावा (प्राकृत)

(छंद अनुष्टुप्)

**अर्जुन उवाच**

सगुण भजती कोणी, भजती कोणी निर्गुण।
त्यामध्ये वरिष्ठ कोण ? । योगी मज सांगणे ॥१॥

**श्री भगवान उवाच**

एकभावे भजता हे, विश्वरूप जनार्दना।
वरिष्ठ योग तो त्यांचा, आवडे मज अंतरी ॥२॥
कोणी नित्य निराकार, अबोल सर्व व्यापका।
एकरस ब्रह्मभावा, अक्षराला उपासती ॥३॥
शरीर धर्म जिंकोनी, परोपकारास वाहिले।
समत्व पावले योगी, त्यांना मी प्राप्त जाहलो ॥४॥
तो निराकार विश्राम, कष्टाने लाभतो तया।
जोवरी शुद्धि देहाची, तोवरी ब्रह्म दुर्मिळ ॥५॥

सत्कर्म-पुष्प वाहोनी, सगुण भजतो मला ।
अनुसरतो मला नित्य, भजतो ध्यान लावुनी ॥६॥
पार्था ! प्रेमळ भक्ताचे, चित्त माझे पदी वसे ।
मृत्युरुपी भवसिंधु, तो तरे शिघ्र यागुणे ॥७॥
वाही मला मनबुद्धी, माझी प्राप्ती तया मिळे ।
यामध्ये संशय नाही, तराया वाट सत्य ही ॥८॥
मनाचे अर्पण नोहे, तरी भक्ति अनुक्रमे ।
स्वरूप आठवोनीया, अभ्यास करणे सदा ॥९॥
दुर्बळा तेही साधेना, तो करी तेच वाहतो ।
स्वरुपसिद्धी ऐश्याने, पावतो जो मदर्पण ॥१०॥
मदर्पण मार्ग ऐसा, तो ही कठीण ना जुळे ।
कर्म फळे मला वाही, मन जिंकी असा कुणी ॥११॥
साधक भाविक श्रोता, त्याहुनी श्रेष्ठ वाचक ।
श्रेष्ठ तयाहुनी ध्याता, विरक्त शांत अंतरी ॥१२॥
कुणाचा द्वेष तो नाही, अभिमान नसे जया ।
सुख दुःखात तो स्थिर, सर्वा अभय देतसे ॥१३॥
समाधान पावलासे, मला जीवन वाहिले ।
मनबुद्धी मला वाही, माझा भक्त मला प्रिय ॥१४॥
प्रसन्न सर्वावरती, शोक द्वेष नसे भय ।
कुणास न करो खिन्न, आवडे मज भक्त तो ॥१५॥
मागणे नाही केव्हाही, आत बाहेर शुद्धता ।
निर्गर्व मोक्ष तो भोगी, आवडे मज भक्त तो ॥१६॥
हर्ष शोक नसे ज्याला, शुभाशुभ न पाहणे ।
निष्काम भावना ज्याची, आवडे मज भक्त तो ॥१७॥

निर्वैर मान ना पाहे, द्वंद्वामाजी समानता ।
संसारी सर्व बाजुंनी, जेणे आसक्ति काढली ॥१८॥
निंदो वंदो तया कोणी, तो रमे ईश चिंतनी ।
वितरागी समाधान, तयाची आवडी मला ॥१९॥
भक्ति-धर्मामृत ऐसे, श्रद्धेने सेवती जनी ।
आवडती मला भारी, निष्काम जे उपासक ॥२०॥
ऐशा गितोपनिषदी, ब्रह्मविद्या योगशास्त्री ।
श्रीकृष्णार्जुन संवादी, द्वादशी 'भक्तियोग' हा ॥२१॥
व्यासकृत गीतामंत्र, वेचुनी भावार्थसुत्र ।
अच्युताने काव्य प्राकृत, केले कृष्णा समर्पण ॥२२॥

( त्यानंतर पूर्ण पात्र वाढून होईपर्यंत पुढील मंत्र जपावा. )

' ॐ हरये नमः '

( धुपारती फिरविली म्हणजे शांतीपाठाला सुरुवात करावी. )

( छंदवृत्त – अनुष्टुप् )

जीवितोभ्यासा ! अमुचे, सारखे कर रक्षण ।
गुरुशिष्य तेजवंत, मिळोनी शौर्य गाजवू ॥
ॐ शांतिः ! शांतिः ! ! शांतिः ! ! !

## ★ सुश्लोक ★

( वृत्त : मालिनी )

वदनि कवळ घेता नाम घ्या श्रीहरिचे ।
सहज हवन होते नाम घेता फुकाचे ।
जिवन करि जिवित्वा अन्न हे पूर्ण ब्रह्म ।
उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ॥१॥

## ★ भोजन महिमा ★

(छंद : हरिगिती)

भोजन नही यह यज्ञ है, ब्रह्माग्निमे यह आहुती ।
नर शुद्ध चित्त सेवन करे, तब ब्रह्म ही होती मती ।
ऐसी किया कर भावना, अर्पण किया कर ब्रह्मको ।
कर फिर भोजन प्रेमसे, सत्बुद्धि पावे धर्मको ।।

## ★ ज्ञानैकाग्रता ★

(छंदवृत्त : अनुष्टुप्)

मी वैश्वानर पोटी, प्राण्यांच्या देहि जागतो ।
प्राणापानाचियारूपे, अन्न खातो चतुर्विध ।।१।।
घास घेणे दुजे नाही, ब्रह्म ब्रह्मास खातसे ।
भोजनी भाव एकाग्र, ब्रह्मभावास पात्र तो ।।२।।

श्री सद्‌गुरुनाथ महाराज की जय !
पार्वतीपते हरहर महादेव !

(ज्या देवतेला आठवून पंगत असेल त्या देवतेचा जयघोष करावा.)

वाढलेले पात्र सभोवार पाणी फिरवून श्रद्धेने इष्ट देवाला अर्पण करावे. तो नैवेद्य प्रसाद समजून शांततेने सुश्लोक म्हणत जयघोष करीत जेवण करावे. पंगतीत बसलेले असतांना सर्वांचे भोजन होईपर्यंत आदराने बसले पाहिजे.

## ★ विष्णुसुक्त-भावार्थ ★

(देवता किंवा गुरुपीठाला अभिषेकाचे वेळेस उपयोगी)

( छंदवृत्त : अनुष्टुप् )

ॐ ज्या विराट पुरुषाच्या, बाहुपासुनी आश्विनी ।
हातापासुनी झालेसे, सुर्य इत्यादि देवता ॥१॥
त्या विराट पुरुषाच्या, ठायी अग्नि विलासतो ।
सुर्यसामर्थ्य त्यामध्ये, इंद्राचे बलही तिथे ॥२॥
हा अभिषेक होतांना, त्यांचा आठव होतसे ।
चिंतने यश लाभावे, बलासोबत संपदा ॥३॥
मन:शांति, देहशांति सर्व संतोष नांदु दे ।
हा अभिषेक होवुं दे, अमृत रूप ॐ नमो ॥४॥

## ★ नमस्काराशिर्वाद ★

(छंदवृत्त : अनुष्टुप्)

नमो सर्व हितकर्ता, जगदाधार हेतु जो ।
माझा प्रणाम साष्टांगे, तयाला यत्नपूर्वक ॥५॥
श्रद्धा मेधा यश प्रज्ञा, विद्या बुद्धि श्रियाबल ।
आयुष्य तेज आरोग्य, द्यावे हे प्रभूराजया ॥६॥
षोडशोपचारे पूजा, तुला अर्पण केली जे ।
त्यांत माझे नसे कांही, तुझे तुला समर्पण ॥७॥

ॐ विष्णवे नम :

## ★ सूर्याघ्यं मंत्र ★

( छंदवृत्त-अनुष्टुप् )

हा जो सूर्य सहस्त्रांश । तेजोराशि जगत्पति ।
कृपावंत असो भक्ता । अर्घ्य देता दिवाकर ॥

## ★ राष्ट्रपूजा ★

( वृत्त- वसंततिलका )

आले शिरावरि जरी घनघोर घाले ।
दारिद्र्य दुःख अपमानहि प्राप्त झाले ।
कारागृही सतत वास करे मरे मी ।
पूजीन मी तरिहि नीर्भय मातृभूमी ॥
जय भारतमाता !

## ★ राष्ट्रवंदना ★

(तर्ज-जन-मन-गण-मन)

तन मन धनसे सदा सुखी हो भारत देश हमारा ।
सभी धर्म अरु पंथ पक्ष को दिलसे रहे पियारा ॥
विजयी हो, विजयी हो, विजयी हो, भारत देश हमारा ॥टेक॥
निर्भय हो यह देशकी माता, मंगल कीर्ति कराने ।
सत्य शील अरु निर्मल मनसे, वीरोको उपजाने ।
सद्‌गुणी हो यह देशकी जनता, जीवन सुख सजवाने ।
रंक - राव - पंडीत - भिखारी, सबको सुख दिलवाने ।
विजयी हो, विजयी हो, विजयी हो, भारत देश हमारा ॥ १ ॥
स्पृश्यास्पृश्य हटे यह सारा, देश कलंक मिटाने ।
सबके मन कर्तव्यशील हो, धन उद्योग बढाने ।
सबका हो विश्वास प्रभूपर, अपनी शक्ति बढाने ।
ब्रह्मचर्य अध्यात्म दैविगुण, घरघरमे प्रकटाने ।
सारा भारत - रहे शिपाई, शत्रुको दहशाने ।
तुकड्यादास कहे स्फुर्ति हो, सबको भक्ति कराने ।
विजयी हो, विजयी हो, विजयी हो, भारत देश हमारा ॥ २ ॥

REFBK-0022523
REFBK-0022523

## ★ जयघोष ★

श्री गुरुदेवकी जय ! ! !

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजकी जय ! ! सब संतनकी जय !

भारतमाताकी जय !

विश्वका कल्याण हो ! धर्मका विजय हो ! अधर्मका नाश हो !

॥ हर-हर महादेव ॥

॥ ॐ तत्सत् ॥

## ★ निद्रास्मरण ★

( छंद : अनुष्टुप )

सूर्यरुपी तुझे डोळे, दिवसा मज पाहती ।
रात्रीरुपी तुझी माया, विश्रांती देतसे मला ॥१॥
भोवती जुळले प्राणी, साहित्य धन धान्य जे ।
ईश्वरा ! ते तुझे देणे, तुला संतोष द्यावया ॥२॥
उद्योगाची फुले कांही, वाहिली ती तुझी कृपा ।
राहिले कार्य जे कांही, पूर्णकर्ता तू श्रीहरी ॥३॥
सत्य चैतन्य आनंदा, अनंता हात जोडतो ।
तुझीच कुस हे भूमी, सात्विकी झोप लागु दे ॥४॥

## ★ भजन धून ★

१) हर हर महादेव सांबा ! काशी विश्वनाथ गंगा !

२) राम राम राम राम । सिताराम सिताराम !

३) गोपाल राधे कृष्ण, गोविंद गोविंद !

४) देव दत्त दत्त ! दत्त देव दत्त !

५) वासुदेव हरी वासुदेव हरी । गीता भागवत वासुदेव हरी!

६) गुरु महाराज गुरु । जय जय परब्रह्म सद्गुरु !

७) श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे । हे नाथ नारायण वासुदेव !

८) हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
   हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।

९) राधाकृष्ण जय कुंजविहारी । मुरलीधर गोवर्धनधारी !

१०) गोपाला गोपाला । देवकी नंदन गोपाला !

११) राधा राधा कृष्ण राधा !

१२) दत्ता दिगंबरा याहो ! दयाळा भेट मला द्याहो !

१३) नारायण नारायण जय गोविंद हरे ।
   नारायण नारायण जय गोपाल हरे !

१४) श्रीराम जय राम जय जय राम !

१५) रामकृष्ण हरी । जय जय राम कृष्ण हरि !

१६) जय दुर्गा जय काली माता ।
   जय अंबे जय चंडी माता ।

॥ हरि ॐ तत्सत् ॥

## ★ आरती ★

सत्‌चित्‌आनंदा, आत्मारामा सुखकंदा ।
जयदेवा जय ब्रह्मस्वरुपा श्री सद्‌गुरुनाथा ।
आरती ओवाळुनी तव चरणी ठेवितसो माथा ॥
चंद्रमंडलांतर्गत निर्मल ब्रह्मरंध्रभुवनी ।
एकवीस स्वर्गावरती आसन साजे कुंजवनी ॥
सहस्रदलपंकजी विराजित गुंफेमाझारी ।
अतसि - कुसुम - समकांती झळके शुक्लांबरधारी ॥
षड्‌चक्रांचे देव वंदिले तीर्थाटन झाले ।
द्विदल पंढरपुरी सद्‌गुरु पाहुनी मन धाले ॥
सद्रुपचिद्रुप आनंदात्मा सज्जन दिनबंधू ।
करुणासागर पूर्ण गुणागर तारक भवसिंधू ॥

प्राणापाने सोऽहम् सूत्रे काया वाणी मने ।
त्रिगुणताटी प्रसाद अर्पण केलासे सुमने ।।
रत्नजडित सिंहासन लखलख रंगरंग भरले ।
चिन्मय मूर्ती ध्यान गुरुचे सोज्वल मनी धरले ।।
श्रवण पठण या प्रदक्षिणेने गुरुवरदेश्वरिला ।
निजध्यासिता ज्ञानदीपाचा प्रकाश संचरिला ।।
अनुहत वेणू शंख झांजरी घागरिया बाजे ।
मृदंग वीणा टाळ नगारा गगनांबरी गाजे ।।
गीता मंत्रपुष्पांजली वाहू गुरुपद अरविंदा ।
प्रसार तीर्था सिंधु सेवुनी पावे आनंदा। सत्चित्आनंदा ।।

## ★ पुष्पांजली ★

पुष्पांजली ही तुला अर्पितो दत्तगुरु सदया ।
तव पदी वंदन करण्या स्फूर्ती द्यावी या हृदया ।।
तुलसी बेल आणि फुले सुवासिक नानाविध माला ।
अर्पितसो बहु प्रेमभरे आम्ही, श्रीगुरुचरणाला ।।
किंचित सेवा भजन पुजन हे घडले ह्या चरणी ।
गोड करुनी घ्या प्रेमे अमुची भक्तांची करणी ।।
दीन दयाळा भक्तवत्सला श्रीगुरु यतिराया ।
पुष्पयुक्त अक्षता अर्पितो प्रेमे तव पाया ।।
साधुसंत ऋषी देवादिक हे नमिती तव पाया ।
धन्य मानिती ते अपुल्याला लागती यश गाया ।।
अत्रिऋषी अनुसूयासुता तू अवतरला जगी या ।
उद्धरण्याला भक्तजनाला पापा हरुनीया ।।
दीनदयाळा आम्ही लेकरे शरण तुला आलो ।
भक्तिप्रेमे पुष्पांजली ही वाहण्याला सजलो ।।

श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील धर्मग्रंथ प्रकाशनाची
श्री संत अच्युत महाराज विरचित

# धार्मिक - पुस्तके

गीता, भागवत, सप्तशती, महाभारत, श्री गुरुगीता,
अनेक संतकथा, सत्यनारायण व्रतकथा,
श्रीमत् भागवत कथासार, श्री शिवमहिम्न स्तोत्र,
श्री गणपत्यथर्वशीर्ष, भजनमाला व तीर्थ महिमा
इत्यादी धार्मिक पुस्तके खरेदी करून
धर्मग्रंथ प्रकाशनाला मदत करा.

नम्रनिवेदन :-श्री देवी भागवत लवकरच छापत आहे.

– प्रकाशक

– पुस्तके मिळण्याची प्रमुख ठिकाणे –

१) धर्मग्रंथ प्रकाशन, शिवभवन-श्री क्षेत्र कौंडण्यपूर,
ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती (विदर्भ)

२) व्यव. सुभाष मुद्रणालय, तपोवन-अमरावती (विदर्भ)